# स न वि वि

नोव्हेंबर - २०२०
वर्ष ३४ अंक ११



## शुभ दीपावली !

# संवाद

नमस्कार, !!!!

मंडळी , गणेशोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला.. सगळ्या प्रकारच्या स्पर्धांची तयारी , मग आयोजन , मग त्यांचे निकाल , परीक्षकांची मनोगतं .. त्यातच पाहुण्या कलाकारांचे एकाहून एक दर्जेदार कार्यक्रम ..अनेक कामं ! पण कमिटीच्या या सगळ्या प्रयत्नांना तुम्ही रसिकांनी जो उदंड प्रतिसाद दिलात, त्याने सगळ्या धावपळीचं सार्थक आणि श्रमपरिहार झाला !

मित्रहो ,चांगलं वाईट , कडू गोड , या एकाच नाण्याच्या दोन बाजू .. यालाच अनुसरून , मधल्या काळात काही दुःखद घटनाही घडल्या . मंडळाशी वर्षानुवर्षाचे घनिष्ट ऋणानुबंध असलेले , पक्षीमित्र , पर्यावरणप्रेमी , वास्तुविशारद असे आपले उल्हास राणे कालवश झाले .. तसंच महाराष्ट्र निवास ट्रस्टचे अध्यक्ष श्री . अजित एदलाबादकर यांच्या मातोश्रींचंही दुःखद निधन झालं .. जुनी जाणती माणसं सोडून गेल्याचं नुकसान कधीही भरून न निघणारं असतं .. त्यांना विनम्र भावांजली..

!

कधी बहर , कधी शिशिर ,  
परंतु , दोन्ही एक बहाणे, |  
डोळ्यांमधले आसू पुसते ,  
ओठांवरले गाणे .... ||

असं म्हणत आपल्याला पुढे जायला हवं ..

म्हणून आता, या कडू - गोड संचिता सह , पुढे जाऊ , दिवाळीच्या शुभसणाच्या स्वागताची तयारी करूया ..

या वर्षी प्रथमच आपण सुरेल दिवाळी पहाट या कार्यक्रमाचं आयोजन करतोय ...!!

नाव आहे... **"नाट्यरंजन"...** अनघा मोडक यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा नाट्यसंगीताचा बहारदार कार्यक्रम सादर करणार आहेत नावाजलेले कलाकार... तेंव्हा खास लोकाग्रहास्तव आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचा जरूर आस्वाद घ्या .. अर्थातच online ! समोर दिवाळीचा ताजा ताजा फराळ, आणि जोडीला आवडीची गाणी ! त्यामुळे या वर्षी 'साग्रसंगीत ' फराळ होऊ द्या असं म्हणायला काही हरकत नाही !

त्याबरोबरच दिवाळीच्या इतर दिवसांचे कार्यक्रमही आहेतच की... तेंव्हा ही सगळी दिवाळीची धम्माल miss करू नका.

शताब्दी वर्ष सोहळ्याचा भाग म्हणून जानेवारी महिन्यात आपण "उत्सव नाट्यकलेचा" साजरा करणार आहोत. विविध ठिकाणाहून एकांकिका आणण्याच्या दृष्टीने आपलाही सहभाग यात अपेक्षित आहे... कसा ते अंक वाचतांना तुम्हाला कळेलच.

चला... ही दिवाळी सर्वांच्या, सर्व प्रकारच्या चिंता निवारणारी जावो असा आशेचा दीप लावूया...

धन्यवाद,

संपादक समिती, सनविवि



# आगामी

१३ ते १६ नोव्हेंबर  दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

आम्ही जाहीर केलेली *ऐतिहासिक किल्ले बनवण्याची स्पर्धा* सुरू झालेली आहे सहभागी स्पर्धक गटांनी उत्साहाने तयारी सुरु केली आहे. हे किल्ले आपल्याला *दिवाळीदरम्यान होणाऱ्या चार दिवसीय कार्यक्रमात* बघायला मिळतील

**शुक्रवार दि.  १३ नोव्हेंबर  -  मनोरंजन -** (संध्याकाळी ७. ३० वाजता)

- ई- बझार व आकाशकंदील कार्यशाळेचा आढावा,
- वैविध्यपूर्ण रांगोळ्या ,
- स्पर्धेतील ऐतिहासिक किल्ले

**शनिवार दि  १४ नोव्हेंबर - ज्ञानरंजन -** (सकाळी ८ वाजता) -

- *दिन दिन दिवाळी* - वेद पुराणां मधील संदर्भांनिशी दिवाळी सण साजरा करण्यामागील संकल्पना

सादरकर्त्या – डॉ. सुचेता परांजपे,पुणे

**रविवार दि.  १५ नोव्हेंबर – नाट्यरंजन -** (सकाळी ८ वाजता)  -

- नाट्यसंगीत  - संकल्पना आणि निवेदन - *अनघा मोडक* सादरकर्ते  - *नीलाक्षी पेंढारकर & सहकलाकार, मुंबई*

**सोमवार दि. १६ नोव्हेंबर –** (सायंकाळी ७ वाजता)  -

- नृत्यरंजन
- दीपांजली - एक नृत्याविष्कार  सादरकर्ते  -स्थानिक  कलाकार
- ऐतिहासिक किल्ला स्पर्धेच्या परीक्षकांचे  मनोगत आणि स्पर्धेचा निकाल.

- या सर्व कार्यक्रमाचे प्रक्षेपण मंडळाच्या वेबसाइट व फेसबुक पेज वर होणार आहे.

तरी जास्तीत जास्त सभासदांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.  https://www.facebook.com/MMBlr.org/

# घडामोडी

***ई-बझार*** - एक आगळीवेगळी शॉपिंगची अनुभूती

दीपोत्सवाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी, महाराष्ट्र मंडळ बंगलोर आणि स्वकृता चॅरिटेबल ट्रस्टनी मिळून ई-बझार आयोजित केला आहे. १६ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबर ह्या महिन्याभराच्या काळात महाराष्ट्र मंडळ आणि स्वकृता या दोन्ही संघाच्या वेबसाईट आणि फेसबुक पेजवर याचे प्रक्षेपण होत आहे. ह्या virtual शॉपिंग च्या योजनेला महिला उद्योजकांनी अगदी भरभरून प्रतिसाद दिला , ३५ उत्साही उद्योजकांनी आपले स्टॉल्स ह्या ई- बझार मध्ये प्रदर्शित केले आहेत.

अपंग मुलांसाठी चालवण्यात येणाऱ्या पुण्याच्या एका संस्थेनेही आपल्या वस्तूंचे प्रदर्शन यात केले आहे.

खाद्यपदार्थ व खाद्यसेवा , कपडे, इमिटेशनचे दागिने, शोभेच्या वस्तू व भेटवस्तू , फर्निशिंग अश्या पाच वेगवेगळ्या कॅटॅगरीज होत्या. चॉकलेट्स , दिवाळीचा फराळ, साड्या , ड्रेस मटेरियल, टेराकोटा चे दागिने, आकाशकंदील , विविध डिझाईनच्या पणत्या, दिवे, क्रोकरी इत्यादी नानाविध रंगीबेरंगी वस्तूंचे स्टॉल्स अतिशय आकर्षकरित्या प्रदर्शित केले आहेत.हि ई-बझार सर्व स्पर्धकांना तसेच आयोजकांनाही लक्षात राहील असा आनंद देऊन जात आहे. सर्व संघांचे व्हिडिओ अपलोड करून सर्व कार्यक्रम सुविहित पार पडण्यासाठी ,मंडळाच्या technical टीम चे विशेष कौतुक.

मंडळातर्फे सुचित्रा खांडेकर व पूजा जोशी आणि स्वकृता तर्फे आरती माहुली, सुनीता देशपांडे व उर्मिला जाधव यांनी ई- बझार चे उत्तम संयोजन केले.

कन्नडा टीव्ही चॅनेल नी आपल्या या सर्व ई- बझारचे त्यांच्या चॅनेलवर प्रक्षेपण केले.

या पॅंडेमिक काळा मधला हा एक नक्कीच स्तुत्य उपक्रम आहे.

**.... सुनीता देशपांडे.**

# श्रद्धांजली

उल्हास राणे एक तेजस्वी व्यक्तिमत्व. कधीकधी अचानक विश्वास न बसणाऱ्या वाईट बातम्या कानावर येतात तशीच एक बातमी म्हणजे उल्हास राणे आपल्याला सोडून गेल्याची. अत्यंत शांत आणि हसरे व्यक्तिमत्व , लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांशीच मैत्रीचे संबंध ठेवणारे अजात शत्रू. व्यवसायाने आर्किटेक्ट असलेले राणेसाहेब खरे रमले ते निसर्गात.

पुराणवस्तू जतन आणि सुशोभीकरण त्याचप्रमाणे पर्यटन हे त्यांचे आवडीचे विषय होते . निरनिराळ्या आर्किटेक्ट असोसिएशन्सशी संबंधित असताना ते वन्य पशुपक्षी जीवनाच्या अभ्यासाशीही निगडित होते. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना तसेच सलीम अली पक्षी मित्र संघटनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली . त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र सरकारने त्यांची सन्माननीय wildlife वॉर्डन म्हणून नेमणूक केली होती. सिक्कीम, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील वनस्पतींचे संशोधन, सूर्यग्रहणाचे वनस्पतींवर होणारे परिणाम महाराष्ट्रातील विकासकामांचा पर्यावरणावर होणारा परिणाम, पाणी बचत मोहीम , वन्य जमातींचे बांधकाम अशा विविध विषयांवर त्यांचा अभ्यास होता. महाराष्ट्रातील किल्ले ,वन उद्योग , वनउद्यानातील चित्ते , बोरिवली, महाराष्ट्रातील पक्षी भ्रमण , लातूर मधील भूकंप आणि पुनर्वसन, अशा कित्येक विषयावर त्यांनी अभ्यासपूर्ण निबंध प्रकाशित केले होते. आर्किटेक्चर आणि पर्यावरण रक्षण या विषयांची संलग्न अशा शिक्षण क्षेत्रात सुद्धा त्यांचा सक्रिय सहभाग होता.

"निसर्गयात्रा प्रकाशन" या नियतकालिकाचे ते काही काळ संपादक होते. चिंपाझी आणि इतरही वन्य प्राण्यांवरील इंग्रजी पुस्तकांचा त्यांनी मराठीत अनुवाद केला होता . 'अभ्युदयाच्या शोधात ' ही त्यांची लिहिलेली मराठी कादंबरी परंतु काळाने त्यांच्यावर अचानक झडप घातल्यामुळे त्यांची हिस्टरी ऑफ इंडियन लँडस्केप डिझाईन , सस्टेनेबल डेव्हलपमेंट थ्रू इन्विरोनमेन्ट डिझाईन, रूरल आर्किटेक्चर ऑफ इंडिया , बियाँड काँझर्वेशन अशी काही पुस्तके अप्रकाशित राहिली .

साउथ आफ्रिका ,टांझानिया , इंडोनेशिया, सिंगापूर ,अमेरिका, ब्राझील, चीन अशा अनेक देशात सुद्धा त्यांना सन्मानित करण्यात आले होते . त्यांच्या या जीवन कार्याचा गौरव म्हणून मंडळाने २०१६ साली त्यांना अभिमान पुरस्काराने भूषविले होते . १९९९ ते २००० साली , उल्हास राणे यांनी मंडळाच्या कार्यकारिणीत काम केले होते.

मंडळाचे आजीव सभासद असलेले , असे हे विद्वान व्यक्तिमत्व आपण हरवले आहे. त्यांच्या मृतात्म्यास शांती लाभो ही प्रार्थना . त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन आणि त्यांना शतशः प्रणाम.

.... राजीव पोतनीस

# देहे त्यागिता किर्ती मागे उरावी

अवयवदाना वरील प्रश्नमंजुषा स्पर्धा.

प्रत्येक दोन मिनिटाला प्रत्यारोपणासाठी अवयव वा त्वचा न मिळाल्याने आपल्या देशातील एका रुग्णाचा मृत्यू होतो आणि याला केवळ जनजागृती हा एकच उपाय आहे. मुळातच अवयवदान या विषयाबद्दल जनसामान्यांत माहितीपेक्षा गैरसमजुती अधिक आहेत, म्हणून सामाजिक बांधिलकी उपक्रमाअंतर्गत महाराष्ट्र मंडळाने अवयवदानावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घ्यायची ठरवलं आणि दहा रोख बक्षिस पण ठेवली. स्पर्धकांत खेळता-खेळता जागृती होईल या उदात्त हेतूने!

म्हणून स्पर्धेत आपण भाग घ्याच आणि त्याच बरोबर आपल्या ओळखीचे जेवढे मराठी बांधव-भगिनी बंगळुरुमध्ये आहेत त्यांनीही सहभागी व्हावे म्हणून मनापासून प्रयत्न करा ही विनंती.

- - - स्पर्धेत सहभागी होण्यासाठी - - *फक्त एवढंच करायचं*

+91-6366651100या नंबर वर *महाराष्ट्र मंडळ स्पर्धेसाठी* अशी पोस्ट व्हाॅट्स्अॅप वरून पाठवायची.

त्या पुर्वी https://www.facebook.com/576113612728712/posts/1315430368797029/

या लिंकवरील व्हिडिओ पाहण्यासाठी जरुर वेळ काढा. या व्हिडिओत कोमलदीदी आपले मन उघडून दाखवते. आभाळा एवढ मोठ्ठ मन कस असतं हे आपल्याला उमगेल!

तिचे नुकतेच निधन झाले. हृदय आणि फुफ्फुस दोन्हीचे ट्रान्सप्लांट करायला लागलेली ती देशातील पहिली रूग्ण! प्रत्यारोपणा नंतर केवळ साडेतीन वर्ष आयुष्य तिला मिळालं, पण त्यातील प्रत्येक क्षण तिने अवयवदानाच्या प्रचारासाठी दिला. तिला माहित होतं आपल्या हातात फार वेळ नाहीये. पण तरीही क्षणाचीही उसंत न घेता अवयवदान प्रचाराचा विडा तिने उचलला.

मग होतायना या स्पर्धेत सहभागी, मी वाट पहातोय!

-----आपटेकाका

# रेशिमगाठी

**विवाहेच्छू तरुण:**

वय - २६, उंची ६ फूट,

शिक्षण B. E. , ( computer Science),

नोकरी / व्यवसाय - Zeta India , बंगलोर येथे नोकरी,

अपेक्षा - इंजिनिअर , नोकरी करणारी,

संपर्क - ९८४४४२६३२३, riteshsanjaymahajan@gmail.com

**विवाहेच्छू तरुण:**

वय - ३८ ,उंची ५ फूट ९ इंच

शिक्षण Msc ( submitted थिसिस फॉर PhD ),

नोकरी - Reseach associate @ ATree , बंगलोर

अपेक्षा - पोस्ट ग्रॅज्युएट , शक्यतो ब्राह्मण ,निसर्गाची आवड असणारी

संपर्क -९७५७१२५२५२

ई-मेल dilipdvelankar@gmail.com

